महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव | गुरुवार, दि. १८ सप्टेंबर २०२५ | वर्ष १ ले | अंक ३०९ | किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

१७०९ : प्रसिध्द ब्रिटीश विद्वान डॉ.सॅम्युअल जॉन्सन यांचा जन्म.
१९२४ : महात्मा गांधीजींनी हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी २१ दिवसाचे उपोषण केले.
१९९२ : माजी उपराष्ट्रपती हिदायतुल्ला यांचे निधन.
१९९७ : कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाची स्थापना.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ८२६९३.७१ | +३१३.०२(०.३८%) |
| डॉलर | ₹ ८७.८२ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | २५ |
| दिल्ली | ३३ | २६ |
| मुंबई | ३१ | २५ |
| नागपूर | ३० | २३ |
| पुणे | २८ | २२ |

## सुविचार

जगण्याची कला म्हणजे स्वत:ला सापडणे आणि स्वत:च्या अस्तित्वाचा उत्सव साजरा करणे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-६:१६ संध्या-६:२८

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,११,७१०/- १,३२,०००/-

**केळी भाव**

नवती : १८५१ ते १८६०
पिल बाग : ६७५ ते ७००
कांदे बाग : ----

# भारत अणुहल्ल्याला घाबरत नाही मोदींचा पाकिस्तानला इशारा

## • पंतप्रधानांनी वाढदिवशीच पाकला ठणकावले

**वृत्तसंस्था । धार**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज ७५ व्या वाढदिवस आहे. या पार्श्वभूमीवर मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यात एका सभेला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा पाकिस्तानला इशारा दिला आहे. हा नवीन भारत आहे आणि तो कोणाच्याही अणु धमक्यांना घाबरत नाही असे पंतप्रधान मोदींनी ठणकावले. तसेच भारताच्या वीर जवानांना पाकिस्तानला काही क्षणांमध्ये गुढघ्यावर आणले असेही मोदी म्हणाले.

मोठ्या जनसमुदायाला संबोधित करताना मोदी म्हणाले की, आज देश मा भारतीच्या सुरक्षेला सर्वोच्च



प्राथमिकता देतो. पाकिस्तानहून आलेल्या दहशतवाद्यांनी आपल्या माता-बहिणींचा सिंदूर पुसला होता. आपण ऑपरेशन सिंदूर करून दहशतवादी तळांना उद्ध्वस्त केले. आपल्या वीर जवानांनी काही क्षणांतच पाकिस्तानला गुडघे टेकायला लावले, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पुढे बोलताना मोदींनी जैश ए मोहम्मदच्या (पान २ वर)

### •हैदराबाद मुक्तीची आठवण

नरेंद्र मोदी यांनी यावेळी बोलताना हैद्राबाद मुक्ती दिनाची देखील आठवण काढली. ते म्हणाले की, आज १७ सप्टेंबर रोजी एक आणखी ऐतिहासिक दिवस आहे. आजच्याच दिवशी देशाने सरदार पटेल यांच्या पोलादी इच्छा शक्तीचे उदाहरण पाहिले होते. भारतीय लष्कराने अनेक अत्याचारांपासून मुक्त करून त्यांच्या अधिकारांची रक्षण करत भारताचा गैरव पुन्हा प्रस्थापित केला होता. देशाच्या इतक्या मोठ्या यशाला आणि लष्कराच्या इतक्या मौठ्या शौर्याला अनेक दशकं लोटली मात्र कोणी आठवण काढणारे नव्हतं. पण तुम्ही मला संधी दिली. आमच्या सरकारने १७ सप्टेंबर, सरदार पटेल आणि हैदराबादची घटनेला अमर केले आहे,

# शेतकरी भवन योजनेस दोन वर्षांची मुदतवाढ

### • नवे भवन बांधकामासाठी १३२ कोटींची तरतूद



**वृत्तसंस्था । मुंबई**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेला दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. राज्यभरात ७९ बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी भवन बांधणे आणि जुन्या शेतकरी भवनांची दुरुस्ती करण्यासाठी १३२ कोटी ४८ लाखा रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांना मुक्कामाची सोय करण्यासाठी आणि मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी शेतकरी भवन बांधणे तसेच अस्तित्वात असलेल्या शेतकरी भवनाची दुरुस्ती करण्याला डिसेंबर २०२३ मध्ये मान्यता देण्यात आली होती. या योजनेस २०२३ २४, २०२४ २५ आणि २०२५ २६ या तीन आर्थिक वर्षांसाठी मान्यता देण्यात आली होती. यासाठी ११६ बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी (पान २ वर)

## थोडक्यात

### कांदा निर्यातीवर मिळणार अनुदान

**मुंबई।** कांदा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर मिळावा आणि बाजारातील कांद्याचे दर स्थिर राहण्यासाठी कांदा निर्यातीवर चार टक्के अनुदान दिले जाईल. काही कारण नसताना अचानक दर पाडून शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने रद्द करून, त्यांना काळ्या यादीत टाकले जाईल, अशी घोषणा पणन मंत्री जयकुमार रावळ यांनी केली. राज्यात गतवर्षीच्या रब्बी हंगामात कांदा लागवडीत वाढ झाली होती. सरासरी सात लाख हेक्टर क्षेत्रात वाढ होऊन दहा लाख हेक्टरवर लागवड झाली.

### ३९४ नगरपरिषदा, नगरपंचायतींत नमो उद्यान

**मुंबई।** राज्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये वैशिष्ट्यपूर्ण व नविन योजने अंतर्गत एक उद्यान विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करतानाच या उद्यानांना ‘नमो उद्यान’ नाव देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. यानिर्णयामुळे राज्यातील एकूण ३९४ नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये नमो उद्यान वर्षभरात विकसित करण्यात येतील.

### • शासनाला गृहनिर्माण धोरणाचा प्रस्ताव सादर

# भाड्याची सरकारी घरे पाच वर्षानंतर मालकीची?

**वृत्तसंस्था । मुंबई**

परवडणाऱ्या घरांचे प्रकल्प राबविण्याबरोबरच तात्पुरत्या स्वरुपाच्या गृहनिर्माणासाठी राज्यात मोठ्या प्रमाणात भाडेतत्त्वावरील घरे निर्माण करण्यास राज्य शासनाने गृहनिर्माण धोरणात प्रोत्साहन दिले आहे. या पार्श्वभूमीवर गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने प्रस्ताव तयार केला आहे.

राज्य शासनाने अलीकडे जाहीर केलेल्या गृहनिर्माण धोरणात नोकरी करणाऱ्या महिला, औद्योगिक कामगार, विद्यार्थी तसेच वरिष्ठ नागरिकांसाठी भाड्याच्या घरांच्या प्रकल्पाला प्रोत्साहन देण्यात आले आहे. या घरांचा लाभ घेणाऱ्या नागरिकांना ही घरे पाच वर्षानंतर मालकी हक्काने देण्याचा प्रस्ताव म्हाडाने




### • गृहनिर्माण धोरणातील तरतुदी

भाडेतत्त्वावरील घरांच्या प्रकल्पात गुंतवणूक करणाऱ्या विकासकांना करामध्ये सवलत देण्याबरोबरच जलद मंजुरीची प्रक्रिया राबविली जाणार आहे. याशिवाय या प्रकल्पासाठी अर्थसहाय्य देण्याबरोबरच विनियमात शिथिलताही आणली जाणार आहे.

पाठवला आहे.

ही घरे मालकी हक्काने मिळणार असतील तर अधिकाधिक रहिवाशी या योजनेचा लाभ घेतील, असा विश्वास म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जैस्वाल यांनी व्यक्त केला.

## पानिपतकारांवर साहित्य चौर्याचा आरोप

**वृत्तसंस्था । छ. संभाजीनगर**

सातारा येथे होऊ घातलेल्या ९९ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झालेले विश्वास पाटील यांच्या अनेक



साहित्यातील कथाबीज चोरलेले असल्याचा एक आरोप त्यांचेच बंधू तथा ‘दाह’ या कादंबरीचे लेखक सुरेश पाटील यांनी केला आहे.

पानिपतकारांनी त्यांच्या लस्ट फॉर लालबाग’ या कादंबरीमध्ये ‘दाह’मधीलच कथाबीज घेतल्याचे सुरेश पाटील यांनी एका लेखामध्ये म्हटले आहे आणि साहित्य वर्तुळातही विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यातील अनेक घटना, पात्रांमध्ये अन्य काही साहित्यातील साधर्म्य आढळून येते.

# भाजपच्या अध्यक्षपदासाठी देवेंद्र फडणवीसांचे नाव चर्चेत

**वृत्तसंस्था । नवी दिल्ली**

पितृपक्ष संपल्यानंतर भारतीय जनता पक्षाला राष्ट्रीय अध्यक्ष मिळू शकतो. बिहार विधानसभा निवडणुकीच्या आधी नवरात्रीच्या सुमारास सत्ताधारी पक्षाला नवा अध्यक्ष मिळण्याची दाट शक्यता आहे. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीनंतर भाजपमधील अंतर्गत गणितं बदलली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन दोघेही ओबीसी आहेत. त्यामुळे आता भाजपकडून ब्राह्मण चेहऱ्याला अध्यक्षपदी संधी देऊ शकतो. यासाठी महाराष्ट्रातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव चर्चेत आले आहे.

दलित समाजातून आलेल्या रामनाथ कोविंद यांना भाजप नं राष्ट्रपती पदावर संधी दिली. विद्यमान राष्ट्रपती आदिवासी आहेत. त्यामुळे आता भाजपच्या अध्यक्षपदी ब्राह्मण नेत्याला संधी मिळावी, अशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची इच्छा आहे. भाजप आणि संघाच्या निकटवर्तीयानं आणि विश्वसनीय सुत्रानं एनबीटी ऑनलाईनला भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे.



जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपतीपदाचा तडकाफ डकी राजीनामा दिला. त्यानंतर राधाकृष्णन उपराष्ट्रपती झाले. यानंतर राष्ट्रीय अध्यक्षपदासाठीची जातीय गणितं बदलली आहेत.. भाजपच्या अध्यक्ष पदासाठी चर्चेत असलेल्या ब्राह्मण चेहऱ्यांमध्ये राज्यसभेचे खासदार दिनेश शर्मा यांच्याही नावाचा समावेश आहे. ते उत्तर प्रदेशचे आहेत. राज्यात त्यांनी उपमुख्यमंत्रिपद भूषवलं आहे. संघातून भाजपमध्ये सक्रिय झालेल्या नेत्यांमध्ये त्यांचा समावेश होतो. पक्ष संघटनेत त्यांनी राष्ट्रीय उपाध्यक्षपद भूषवलं आहे. गुजरातमध्ये पक्षाचे प्रभारी महासचिव म्हणून काम केलं आहे. लखनऊचे (पान २ वर)

# आठ वर्षीय मुलीच्या पायात बंदुकीची गोळी!

### • मोहाडी येथील घटना; सात महिन्यापूर्वी रुतली पायात

**प्रतिनिधी । जळगाव**

तालुक्यातील मोहाडी येथे आठ वर्षीय मुलीच्या पायाला सात महिन्यांपूर्वी अचानक बंदुकीची गोळी लागली होती. त्याबद्दल अनभिज्ञ असलेल्या पालकांनी तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, तिथे तिच्या पायावर टाके घालून प्राथमिक उपचार तेवढे करण्यात आले. आता पुन्हा मुलीला तीव्र वेदना सुरू झाल्यानंतर तिच्या पायात अद्याप गोळी अडकून असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले.

मोहाडी गावात आठ वर्षीय मुलगी आपल्या मैत्रिणींसोबत अंगणात खेळत असताना अचानक तिच्या पायाला गंभीर दुखापत झाली. घाबरलेल्या पालकांनी तिला तातडीने मोहाडीतील नव्याने सुरू झालेल्या रुग्णालयात नेले. मात्र, रक्तस्त्राव वाढत असल्याने तेथील डॉक्टरांनी तिला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात उपचारासाठी हलविण्याचा सल्ला दिला. प्रत्यक्षात शासकीय रुग्णालयात तिच्या जखमेवर फक्त टाके घालून मलमपट्टी करण्यात आली. आणि उपचार पूर्ण झाल्याचे सांगत तिला घरी सोडण्यात आले. परंतु, सात महिने उलटताच तिच्या पायात पुन्हा तीव्र वेदना सुरू झाल्या. बोटे काळी पडू लागल्याने पालकांनी तिला जळगाव शहरातील एका खासगी रूग्णालयात दाखल केले. तिथे तपासणीदरम्यान एक धक्कादायक बाब समोर आली. मुलीच्या पायात अद्याप बंदुकीची गोळी अडकून असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केल्याने सर्वांना धक्का बसला. खासगी रूग्णालयातील डॉक्टरांनी मुलीच्या पायात गोळी आढळल्याचे लक्षात घेताच तातडीने उपचार सुरू केले.

## राहुल गांधींच्या दौऱ्यामुळे भाजपात खळबळ

**वृत्तसंस्था । रायबरेली**



लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गेल्या आठवड्यात रायबरेली मतदारसंघाचा दौरा केला. त्यांच्या या दौऱ्यामुळे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले; तर भाजपाच्या गोटात खळबळ उडाली. १० सप्टेंबर रोजी राहुल गांधी हे लखनऊ येथून रायबरेलीकडे जात असताना भाजपाचे मंत्री दिनेश प्रताप सिंह यांनी आपल्या समर्थकांसह त्यांच्याविरोधात आंदोलन केले.

# चमणकर बंधूंविरुद्धचा गैरव्यवहाराचा खटला रद्द

### • महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरण

**वृत्तसंस्था । मुंबई**

नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन, ताडदेव येथील आरटीओ इमारत आणि कलिना येथील झोपडपट्टी पुनर्वसन (झोपु) प्रकल्पाच्या कंत्राटांमध्ये अनियमितता केल्याचा आरोप असलेल्या चमणकर एंटरप्रायझेस आणि त्यांच्या दोन संचालकांविरुद्ध सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेले आर्थिक गैरव्यवहाराचे प्रकरण उच्च न्यायालयाने मंगळवारी रद्द केले.

याचिकाकर्ती कंपनी आणि तिच्या संचालकांना जुलै २०२१ मध्ये राज्य भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मूळ गुन्ह्यातून दोषमुक्त केले होते. त्यामुळे, आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) तरतुदींनुसार दाखल गुन्हा कायम ठेवता येऊ शकत नाही, असे निरीक्षण न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठाने नोंदवले. तसेच, चमणकर एंटरप्रायझेस आणि




तिचे दोन संचालक कृष्णा व प्रसन्न शांताराम चमणकर यांच्याविरुद्ध ईडीने नोंदवलेली तक्रार व आरोपपत्र रद्द केले.

विशेष न्यायालयाने ३१ जुलै २०२१ रोजी दिलेल्या दोषमुक्तीच्या आदेशाला चार वर्षांहून अधिक काळ आव्हान देण्यात आले नाही. तसेच, महाराष्ट्र सदन व इतर प्रकल्प करारानुसार बांधले गेले होते आणि याचिकाकर्त्यांविरुद्ध अनियमिततेचे कोणतेही पुरावे नाहीत, असे विशेष न्यायालयाने दोषमुक्तीच्या आदेशात म्हटले होते. ईडीने जम्मू आणि काश्मीर उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला देत चमणकर यांच्या याचिकेला विरोध केला.


न्यायालयाने न्यायमूर्ती गडकरी आणि न्यायमूर्ती पाटील यांच्या खंडपीठाने मात्र ईडीचा युक्तिवाद फेटाळून लावला. तसेच, जम्मू आणि काश्मीर उच्च न्यायालयाचा निर्णय महाराष्ट्रात बंधनकारक नसल्याचे म्हटले. पीएमएलए प्रकरणाशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचाही न्यायालयाने चमणकर यांना दिलासा देताना दाखला दिला. नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन इमारतीचे बांधकाम, ताडदेव येथील आरटीओ इमारत आणि कलिना येथील झोपु प्रकल्पाच्या कंत्राटांमध्ये अनियमितता केल्याबद्दल चमणकर (पान २ वर)

# राज्यात ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये १८ लाख हेक्टरवर नुकसान

## • मराठवाड्यात सर्वाधिक जोर; अतिवृष्टीचा ३० जिल्ह्यांना फटका

**वृत्तसंस्था । मुंबई**

राज्यात ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टी, महापुरामुळे १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टरचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीचा ३० जिल्ह्यांना फटका बसला आहे. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी घाबरुन जाऊ नये. ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर काही जिल्ह्यातील पंचनामे पूर्ण होऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. उर्वरित पंचनामे पूर्ण करून तत्काळ मदत देण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी



दिली.राज्यात पावसाचे थैमान चालू असून, गेल्या दोन महिन्यांत अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांतील १९५ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ महसूल मंडलांमधील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दोन महिन्यांत सुमारे १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. अद्याप पंचनामे करण्याचे काम सुरू आहे.

### अतिवृष्टीचा या जिल्ह्यांना बसला फटका

खान्देशात जळगाव, धुळे, नाशिकसह मराठवाड्यात पावसाचा जोर जास्त आहे. नांदेड, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, सोलापूर, हिंगोली, धाराशिव, परभणी, अमरावती, जळगाव, वर्धा, सांगली, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, रत्नागिरी, चंद्रपूर, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, गडचिरोली, रायगड, नागपूर आणि पुण्यात नुकसान झाले आहे. सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे.

# मीनाताई ठाकरे पुतळ्याची विटंबना

**वृत्तसंस्था । मुंबई**



दादरमधील शिवाजी पार्क मैदानावरील माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर आज सकाळी अज्ञात इसमाने लाल रंग फेकल्याने तणाव निर्माण झाला आहे. या प्रकरणाची दखल गृहखात्याने घेतली आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी पोलिसांची तीन विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. दोषींना लवकरात लवकर शोधून कारवाई करू, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली. दादरच्या शिवाजी पार्क मैदानाच्या प्रवेशद्वारावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी मीनाताई ठाकरे यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. मीनाताई ठाकरे यांना शिवसैनिकांमध्ये त्यांच्याबद्दल अत्यंत आदराचे स्थान आहे. शिवाजी पार्कला येणारे शिवसैनिक माँसाहेबांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होतात. या पुतळ्यावर बुधवारी सकाळी कुणी तरी लाल रंग टाकल्याचे आढळले. ही बातमी पसरतात संतप्त शिवसैनिकांनी शिवाजी पार्क मैदानात गर्दी केली होती.

# आपला खान्देश

epaper.shauryamarathi.com | जळगाव | गुरुवार, दि. १८ सप्टेंबर २०२५


## संपादकीय

### निवडणुकांची प्रतीक्षा

महाराष्ट्रातील जनता, विविध राजकीय पक्षांचे इच्छुक उमेदवार आणि सर्व राजकीय नेते गेले अनेक दिवस राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याची वाट पहात आहेत. यापूर्वी न्यायालयाने चार महिन्यांच्या मुदतीत या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश दिला होता, आता हा अवधी संपत आला असतानाच पुन्हा या निवडणुकांना मुदतवाढ मिळाली असून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार या निवडणुकांची प्रक्रिया आता पुढच्या वर्षीच पूर्ण होऊ शकणार आहे. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत ही निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. यात आता मुदतवाढ दिली जाणार नाही असेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आता या निवडणुका आणखी चार-पाच महिने पुढे ढकलल्या गेल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या शिफारसी वरूनच या निवडणुका लांबणीवर पडल्या, कारण या निवडणुकांसाठी आमच्याकडे कर्मचार्यांची कमतरता आहे, ईव्हीएमची कमतरता आहे आणि सध्या सणासुदीचे दिवस आहेत अशी कारणे सांगून सुप्रीम कोर्टात मुदतवाढीची मागणी केली गेली. कोर्टाने ती मान्य केली आणि या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या. गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. कधी ओबीसी आरक्षण, कधी प्रभागांची रचना, कधी वार्डाची फेररचना अशा अनेक अडचणी यात वेळोवेळी उद्भवत गेल्या आणि निवडणुका लांबणीवर पडत गेल्या. या निवडणुकांमध्ये केवळ महापालिकांच्या निवडणुकाच नव्हे तर जिल्हा परिषदा, नगरपालिका अशा सर्वच स्तरावरील निवडणुकांचा समावेश आहे. मुळात राज्य सरकारलाही या निवडणुका तत्परतेने घेण्यात फार स्वारस्य दिसले नव्हते. आधीच्या आदेशानुसार आता दिवाळीनंतर या निवडणुका होतील हे स्पष्ट झाल्यामुळे राजकीय पक्षांच्या नेत्यांनी त्यानुसार मोर्चेबांधणी सुरू केली होती. पुण्यासारख्या ठिकाणी यासाठी लगबग सुरू झालेली पाहायला मिळाली होती. प्रभागाच्या रचनेचे काम जवळपास अंतिम टप्प्यात आले आहे, हरकती सूचनांचा विचार झाला आहे आणि आता फक्त निवडणूक तारखाच जाहीर होण्याचा अवकाश आहे असे सगळे वातावरण असताना सुप्रीम कोर्टाचा आज हा निकाल आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्यांचा कारभार हा स्थानिक पातळीवरील विकासासाठी महत्त्वाचा असतो. अनेक बारीक-सारीक समस्या स्थानिक पातळीवरच सुटत असतात, पण तेथील निवडणुकाच तीन-चार वर्षे रखडणार असतील तर स्थानिक प्रश्नांना वाचा कोण फोडणार हा प्रश्न आजही प्रलंबित राहिला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी नसले तरी प्रशासकांमार्फत कारभार सुरू आहे असे जरी सांगितले जात असले तरी, या प्रशासकांना नागरिकांच्या स्थानिक समस्या तितक्या प्रकर्षाने जाणवण्यात मर्यादा आहेत. तसेच प्रशासक हातचे राखून विकासकामाच्या संबंधात चालढकल करताना दिसत आहेत. त्यामुळे ही निवडणूक प्रक्रिया वेगाने पूर्ण व्हावी अशी अपेक्षा आहे. अर्थात तेथे निवडून आलेले लोकप्रतिनिधी फार कार्यक्षम असतात अशातला भाग नाही, पण निदान आपापल्या भागातील समस्यांचा आवाज तरी ते समर्थपणे प्रशासनापर्यंत पोहोचवू शकत असत. महाराष्ट्रात स्थानिक निवडणुकांमध्ये इतका मोठा गॅप राहण्याचा अलीकडच्या काळातला हा बहुदा पहिलाच प्रकार असावा. योग्य वेळी या निवडणुका पार पडाव्यात यासाठी राज्य सरकार तत्पर असायला हवे होते, पण ते तितके तत्पर राहिले नाही. अर्थात यामागे राजकीय कारणेही बरीच आहेत. महाराष्ट्रात तीन पक्षांची जी सत्ताधारी आघाडी आहे, त्या आघाडीतच या निवडणुकांच्या माध्यमातून मोठे वितुष्ट निर्माण होण्याची शक्यता आहे. राज्यातल्या सर्व महत्त्वाच्या शहरांमधील महापालिका आणि जिल्हा परिषदा आपल्या ताब्यात राहाव्यात यासाठी सत्ताधारी आघाडीतील तीनही पक्षांमध्ये जोरदार चुरस सुरू आहे. त्यामुळे त्यांच्या आपापसातील लढाईलाच या निमित्ताने तोंड फुटणार होते. ही आपापसातील लढाई सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे निदान काही महिने तरी पुढे ढकलली गेली आहे. अन्यथा विद्यमान सत्ताधार्यांपुढे या एका वेगळ्याच कटकटीला सामोरे जाण्याचे आव्हान निर्माण झाले असते. या निवडणुकांच्या मागच्या अडचणी, समस्या आणि कारणे काहीही असली तरी या निवडणुका तातडीने होणे हे स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. सूक्ष्म पातळीवरून स्थानिक विकासाला चालना देण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या अस्तित्वासह स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत असणे कधीही फायद्याचे ठरते. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुका लांबणीवर टाकण्याचा जो निर्णय घेतला तो घेताना आता यापुढे मुदतवाढ दिली जाणार नाही अशी जी ठाम भूमिका घेतली आहे त्याचे स्वागत करावे लागेल. त्यामुळे निदान चार महिन्यांच्या विलंबाने का होईना या निवडणुकांचे भिजत घोंगडे मार्गी लागणार आहे यातच आता निवडणूक इच्छुकाना आनंद मानावा लागेल.

# मराठा आरक्षणाचा शासन निर्णय बेकायदेशीर

## ● समता परिषद, ओबीसी, भटके विमुक्त, अलुतेदार-बलुतेदारसह विविध संघटनांचे तहसिलदारांना निवेदन

**प्रतिनिधी । तळोदा**

**राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेटीअरवरुन मराठा आरक्षण संदर्भात नुकताच शासन निर्णय घेतला आहे. मात्र घेतलेला हा निर्णय पूर्णपणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे सदर शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी तळोदा येथील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, सकल ओबीसी समाज, भटके विमुक्त, विविध अलुतेदार-बलुतेदार संघटना यांनी तहसीलदार दीपक धिवरे यांच्याकडे केली आहे.**



याबाबत तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, नुकतेच मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या दबावाखाली येऊन राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेटियरवरुन मराठा आरक्षण संदर्भात २ सप्टेंबर २०२५ रोजी शासन निर्णय घेतला. मात्र घेतलेला हा निर्णय पूर्णपणे बेकायदेशीर आहे. मराठा समाजाला याआधीच ईडब्लूएस १० टक्के आणि एसईबीसी प्रवर्गातून १० टक्के आरक्षण मिळत आहे. शिवाय न्या. शिंदे समितीच्या माध्यमातून ५८ लाखाहून अधिक बोगस कुणबी नोंदी करुन घेऊन ओबीसी आरक्षणात घुसविण्याचा प्रकार सुरु आहे. त्यावर यापूर्वीच आठ लाख हरकती नोंदविल्या गेल्या आहेत. असे असतांनादेखील शासन ओबीसींच्या संदर्भात दुजाभावाची भूमिका घेत आहे.

सद्यस्थितीत असंवैधानिक पध्दतीने घटनाबाह्य आंदोलन उभारुन दबावतंत्र वापरण्याचा कार्यक्रम सर्रासपणे सुरु आहे. सामाजिक, राजकिय, आर्थिकदृष्ट्या प्रबळ असलेल्या मराठा समाजाला अप्रत्यक्षप्रमाणे अनेकविध छुपी क्लुप्ती वापरुन, सगेसोयरे आणि गणगोताचा आधार घेऊन ओबीसी प्रवर्गात हेतूपुरस्सर आत घुसण्याचा प्रकार चालू आहे. अशाने ओबीसींचे हक्क आणि अधिकारावर बाधा येणार आहे. त्यामुळे ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण देण्यात येऊ नये.

मागणी मान्य न झाल्यास सकल ओबीसी समाज रस्त्यावर उतरून राज्यभर तीव्र आंदोलन करतील असा इशारा देण्यात आला आहे. निवेदन देताना तळोदा माळी समाजाचे अध्यक्ष अनिल माळी, उपाध्यक्ष विजय शेंडे, सचिव हिरालाल कर्णकार, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र वाघ, तालुकाध्यक्ष अजित टवाळे, सरचिटणीस रामकृष्ण मोरे, सुपडू शिंपी, माजी नगरसेवक संजय माळी, डॉ.डी.बी. शेंडे, जी.बी. चौधरी, ईश्वर मगरे, मणिलाल प्रजापती, हेमलाल मगरे, बाळू राणे, प्रवीण चौधरी, प्रदिप चौधरी, मितलकुमार टवाळे, अंबरीश सूर्यवंशी, रफिक मनिमार, उमेश ठाकरे, भिका मगरे, प्रा. रमेश मगरे, राजा साळी, संजय पटेल, शिरीष माळी, खुशाल सागर, रविंद्र मगरे, शशीकांत सूर्यवंशी, महेश देवरे, सुनिल चव्हाण, संजय शेंडे, अनिल सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

### ● अशा आहेत मागण्या

हैद्राबाद गॅझेटीयरवरील शासन निर्णय तात्काळ रद्द करावा, ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण देऊ नये, अन्यायकारक व पक्षपाती न्या. शिंदे समिती बरखास्त करावी, ओबीसीमध्ये नव्याने समाविष्ठ केलेल्या ५८ लाख बोगस नोंदी रद्द कराव्यात, ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाची होत असलेली घुसखोरी कायमस्वरुपी थांबवावी, मराठा आरक्षणावर घेतलेल्या ८ लाख हरकतींचा खुलासा त्वरीत करण्यात यावा, सारथी प्रमाणेच महाज्योतीला पण सर्व सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात.

## कुंडाई माता मंदिराची ट्रस्ट बेकायदेशीर

**प्रतिनिधी । शिरपूर**

संपूर्ण खान्देशातील कोळी सामाजातील शिरसाठ कुळाची कुलदैवत आई कुंडाई मातेच्या मंदिराच्या नावे असलेला ट्रस्ट बेकायदेशीर असल्याचा आरोप करीत तहसीलदार महेंद्र माळी यांना निवेदन देण्यात आले.

दरबारसिंग भोजूसिंग राऊळ (रा.वनावल, ता.शिरपूर) यांनी बेकायदेशीर ट्रस्ट स्थापन केला आहे. या ट्रस्ट माध्यमातून होणारे व्यवहार व कामकाज तातडीने थांबविण्याची मागणी श्रीराम शिरसाठ, प्रल्हाद शिरसाठ, दिनेश सोनवणे, सागर शिरसाठ, अनिल शिरसाठ, तुकाराम शिरसाठ, संदीप शिरसाठ, रावसाहेब शिरसाठ, सुरेश शिरसाठ, शानाभाऊ शिरसाठ, जगदीश शिरसाठ, आक्काबाई शिरसाठ, वंदनाबाई शिरसाठ, अनिताबाई शिरसाठ, सरलाबाई शिरसाठ यांच्यासह शिदखेडा, शिरपूर, अमळनेर तालुक्यातील समाज बांधव व महिलांनी केली आहे.

दरबारसिंग भोजूसिंग राऊळ यांनी कोळी समाजाला विश्वासात न घेता परस्पर २९ जून २०१८ रोजी नोंदणी करुन ट्रस्टची स्थापना करुन घेतली असल्याचा आरोपही यतहसीलदार महेंद्र माळी यांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आला आहे.

## नागझिरीत सव्वातीन लाखांची दारू जप्त

**प्रतिनिधी । शहादा**



तालुक्यातील नागझिरी शिवारात एका शेतामध्ये स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने छापा टाकून ३ लाख २८ हजार ४४० रुपये किमतीचा दारुचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एकाविरुद्ध म्हस-वद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

म्हसावद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागझिरी गावाच्या शिवारात शिवा भिल (रा. नामबारपाडा पो. राणीपूर ता. शहादा) याच्या शेताच्या बांधावरील झोपडीच्या आडोश्याला रतिलाल ऊर्फ रडत्या भिल याने विनापरवाना बिअर व विदेशी दारु चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ठेवली आहे, अशी माहिती पोलीसांना मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने म्हसावद पोलीस ठाण्याच्या मदतीने नागझिरी गावात शिवा भिल याच्या शेत ाजवळील झोपडीच्या आडोशाला उभ्या असलेल्या रतिलाल ऊर्फ रडत्या आलम भिल, रा. नागझिरी, ता. शहादा याच्याजवळ खोक्यांचा साठा दिसून आला. तेथे पोलीसांनी पाहणी केली असता बिअर व विदेशी दारुचा एकुण ३ लाख २८ हजार ४४० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. रतिलाल ऊर्फ रडत्या आलम भिल याच्याविरुध्द म्हसावद पोलीस ठाण्यात महा. दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कामगिरी पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोउपनि मुकेश पवार, पोहेकों जितेंद्र पाडवी, पुरुषोत्तम सोनार, पोना विकास कापूरे पोकॉ अभिमन्यु गावीत, भरत उगले यांच्या पथकाने केली.

## शहाद्यात शिक्षकाच्या घरातच चोरांनी भरवली शाळा

**प्रतिनिधी । शहादा**

शहरातील मनीषानगरात प्राथमिक शिक्षकाच्या घरात चोरी झाल्याची घटना १५ सप्टेंबर रोजी समोर आली. चोरट्यांनी घरात प्रवेश करुन तब्बल ९४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी केला आहे. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राहुल रमेश पवार यांच्या घरात ही चोरी झाली आहे. राहुल पवार यांचे नेताजी हायस्कूल जवळील मनिषा नगरात प्लॉट क्रमांक ४४ हे घर आहे.राहुल पवार हे १२ ते १४ सप्टेंबर या कालावधीत गावी गेले असल्याने त्यांचे घर बंद होते. यादरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचा दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला होता. चोरट्यांनी घरात प्रवेश करत आतील कपाटात ठेवलेली ५२हजार रुपयांची सोन्याची चैन, १२ हजार रुपयांची सोन्याची अंगठी, १०हजारांची सोन्याची अंगठी, २० हजार रुपयांचे सोन्याचे ब्रेसलेट असा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी शहादा पोलिसाात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भंगीऐवजी तत्सम जातीचा उल्लेख करण्याची मागणी

**प्रतिनिधी । शिरपूर**

दैनंदिन व्यवहारात भंगीऐवजी रुखी किंवा वाल्मिकी या तत्सम जातीचा उल्लेख करून तसा आदेश निर्गमित करण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाच्या सदस्या आणि माजी नगराध्यक्षा शिलाबाई रमेश कडोसे यांनी केली आहे.

जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वर्षानुवर्षे स्वतःची काळजी न करता लोकांच्या आरोग्याची काळजी करून वाल्मिकी समाजाचे लोक आजपर्यंत स्वच्छतेच्या माध्यमातून जनहिताची सेवा करीत आहेत. शासनाने दि. ९ नोव्हेंबर २००० रोजी पारित केलेल्या परिपत्रका नुसार भंगी हा शब्द अपमानकारक व घृणास्पद, बहिष्कृत अशा अर्थाने व्यवहारात प्रचलित झालेला आहे. पंचवीस वर्षाचा कालावधी लोटला तरी शासनाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांमध्ये वाल्मिकी समाजास भंगी म्हणूनच संबोधले जाते.

आपल्या अधिपत्या खालील सर्वच कार्यालय व शिक्षण क्षेत्रात भंगी याच शब्दाचा जातीने उल्लेख केला जातो व शासनाच्या परिपत्रकास केराची टोपली दाखवली आहे. याशिवाय वाल्मिकी समाजातील नागरिकांना आज पावेतो देण्यात आलेल्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रावर देखील भंगी असाच उल्लेख आहे. त्या सर्व प्रमाणपत्रांवर सुद्धा सुधारणा करून भंगी ऐवजी रुखी किंवा वाल्मिकी असा उल्लेख करून मिळणे बाबत संबंधित यंत्रणेस आदेशित करण्यात यावे. तसेच जिल्हाधिकारी महोदय आपल्या स्तरावर नगरपरिषद, जिल्हा परिषद, सामान्य रुग्णालय, महसूल विभाग व इतर विभागांना भंगी ऐवजी वाल्मिकी किंवा रुखी या जातीचा उल्लेख दिशादर्शक फलकावर, गल्लीवर त्यांच्या रेकॉर्डला नोंद करणे करिता आदेश निर्गमित करावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदन प्रसंगी शिलाबाई कडोसे, राजेश ढडोरे, हेमंत जाधव, बलवंत भुरट, कमल कडोसे, श्रुती कडोसे, इंदर चिरावंडे आर्दीनी केले आहे.

## देवमोगरा विद्यालयातर्फे पंचायतराज अभियान रॅली

**प्रतिनिधी । नंदुरबार**

तालुक्यातील वसलाई येथील देवमोगरा विद्यालयातर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीचे उद्घाटन सरपंच टेडग्या वळवी यांच्याहस्ते करण्यात आले. रॅलीतून सुशासन युक्त पंचायत, सक्षम पंचायत, जनसमृद्ध विविध विषयांवर जनजागृती करण्यात आली. रॅलीत मुख्याध्यापक हिरालाल लिंगायत, संजय दातीर, हेमंतकुमार पाडवी, शंकर सोनार, दिलीप वळवी, जितेंद्र पाडवी व विद्यार्थी सहभागी झाले होते.

## पान १ वरुन

**भारत अणुहल्ल्याला......**

कमांडरच्या एका व्हिडीओचा दाखाला दिला या व्हिडीओमध्ये जैश ए मोहम्मदचा टॉप कमांडर मसूद इलियास काश्मिरीने ७ मे रोजी झालेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये मसूद अझहरच्या कुटुंबातील सदस्य ठार झाल्याचं सांगितले आहे. मोदी म्हणाले की, कालच देश आणि जगाने पाहिले की पुन्हा एका पाकिस्तानी दहशतवाद्याने रडत-रडत परिस्थिती सांगितली हा नवीन भारत आहे, हा कोणाच्याही अण्वस्त्र धमक्यांना घाबरत नाही. हा नवा भारत आहे, घरात घुसून मारतो, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

**शेतकरी भवन योजनेस......**

भवन बांधण्यासाठी १०३.९८ कोटी आणि अस्तित्वातील शेतकरी भवनांच्या दुरुस्तीसाठी २८.५० कोटी याप्रमाणे एकूण १३२.४८ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. या योजनेस मिळत असलेला प्रतिसाद विचारात घेऊन पुढे २०२६ २७ आणि २०२७ २८ या दोन आर्थिक वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. दरम्यान, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आतापर्यंत शेतकरी भवन बांधण्याचे ७९ नवीन प्रस्ताव प्राप्त झाले असून, त्यापैकी ४५ प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे.

**भाजपच्या अध्यक्षपदासाठी......**


महापौर राहिलेल्या दिनेश शर्मा यांचं नाव अध्यक्षपदाच्या शर्यतीत आहे. भाजप आणि संघाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय अध्यक्ष पदासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचंही नाव चर्चेत आहे. विधानसभा निवडणुकीतील दणदणीत विजयानंतर फडणवीस यांचं नाव अध्यक्ष पदाच्या शर्यतीत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचं समीकरण बांधण्यासाठी आणि पक्षात पुढच्या पिढीचं नेतृत्व तयार करण्यासाठी फडणवीस यांना संधी दिली जाऊ शकते.

**चमणकर बंधूंविरुद्धचा......**

एंटरप्राइझेससह तिच्या संचालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या कंत्राटाच्या बदल्यात चमणकर यांनी राज्याचे तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांच्या कुटुंबातील सदस्यांना लाच दिल्याचा आरोपही त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. तथापि, विशेष न्यायालयाने २०२१ मध्ये एसीबीने दाखल केलेल्या प्रकरणातून कंपनी आणि तिच्या भागीदारांना दोषमुक्त केले होते.

## बोधकथा

### वृत्ती



राजा सहदेवाकडे राणीने हट्ट धरला. माझ्या एकुलत्या एका भावाला मंत्रिपद द्या. प्रधान करा. आपल्या या मेहुण्याच्या स्वभाव राजाला ठाऊक होता. मात्र प्रिय राणीचा हट्ट कसा मोडणार? राजाने मेहुण्याला कोषाध्यक्ष केले. त्या बहाद्दराने एका वर्षात सारा खजिना खाली केला. मग राजाने त्याला व्यापार खाते दिले तर लोकांच्या तक्रारी येऊ लागल्या. राजाने मेहुण्याला अनेक खाती देऊ पहिली. पण जनकल्याण होण्याऐवजी नुकसानच होऊ लागले.

अखेर वैतागून राजाने त्याला बंदरावर अधिकारी नेमले. काम एकच समुद्राच्या लाटा मोजण्याचे. सुरव-तीला मेहुणा खुष नव्हता. पण काही दिवसांनी राजाच्या हेरांनी सांगितले की, मेहवण्याने गडगंज संपती मिळवली होती. या मागची चौकशी करता समजले की, मेव्हणा बंदरात मुक्काम ठोकून होता. गलबतांना बंदरात लागण्यास मज्जाव करत होता. कारण काय तर लाटा मोजण्यास अडथळा येतो. सरकारी कामात व्यत्यय म्हणून तो दंड आकारण्याच्या निमित्ताने गलबतांच्या मालकांकडून तो खंडणी वसूल करत असे. अशा रीतीने त्याने महिनाभरात गडगंज संपती जमा केली.

**तात्पर्य :- भ्रष्ट अधिकार्यांच्या बदलीने समस्या सुटत नाहीत. कारण समस्या पदाच्या नव्हे तर व्यक्तीच्या असतात. म्हणूनच वृत्ती बदलण्याची सेवा हीच सर्व श्रेष्ठ सेवा.**

## राशिभविष्य

**मेष :** आज तुम्ही तुमच्या मुलांच्या भविष्याबद्दल चिंतित होऊ शकता. वैवाहिक जीवन सुखमय राहील. आर्थिक स्थिती सुधारण्याचे तुमचे प्रयत्न यशस्वी होतील.

**वृषभ :** आज अनावश्यक खर्च टाळा. नशीब साथ देणार नाही त्यामुळे संयमाने अडचणी दूर करा. कामावर लक्ष केंद्रित करा नाहीतर तुमच्यावर खोटे आरोप होऊ शकतात.

**मिथुन :** आज कोणतेही काम करण्यासाठी वेळ शुभ आहे. सहकाऱ्यांच्या मदतीने तुम्हाला अडचणीतून मार्ग मिळेल. प्रेम जीवनात आनंद राहील.

**कर्क :** कुटुंबात तणाव जाणवेल त्यापासून दूर राहा. आरोग्याची काळजी घ्या. जुन्या मित्रांना भेटल्याने आनंद मिळेल. वैयक्तिक आयुष्यात कोणालाही वचन देऊ नका ते पूर्ण होण्याची शक्यता कमी आहे..

**सिंह :** मुलांची प्रगती पाहून तुम्हाला आनंद होईल. तुमच्या कुटुंबातील काही रखडलेली कामे तुमच्या भाऊ-बहिणीच्या मदतीने पूर्ण होतील.

**कन्या :** आज जे लोक राजकारणात आहेत त्यांना यश मिळेल. जीवनसाथीच्या भावना समजून घ्या. तुमचा जोडीदार आज आनंदी असेल. भूतकाळ आणि भविष्याच्या योजनांमध्ये अडकू नका. वर्तमानात जगा आणि प्रत्येक क्षणाचा आनंद घ्या.

**तुळ :** विद्यार्थ्यांना भविष्यातील निर्णय घेण्यासाठी शिक्षक आणि कुटुंबाची मदत मिळेल. तुमच्या व्यवसायात बदल होतील आणि नवीन संधी मिळतील.

**वृश्चिक :** आज तुमची आर्थिक स्थिती चांगली राहील. तुम्ही मनसोक्त खरेदी करू शकता. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**धनु :** आज तुम्ही तरुणांना कामाच्या ठिकाणी प्रोत्साहन द्याल. तुम्ही तुमच्या मुलांच्या भविष्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेऊ शकता

**मकर :** आज गैरसमजामुळे तुमच्या प्रेम जीवनात अडचणी येऊ शकतात. आजचा दिवस तुमच्यासाठी मध्यम फलदायी आहे. नात्यांमध्ये मतभेद होऊ शकतात.

**कुंभ :** आज तुमच्या आई-वडिलांच्या आशीर्वादामुळे तुमचे काम व्यवस्थित होईल. आर्थिक बाबतीत नशीब तुमच्या सोबत असेल.

**मीन :** आज कामाच्या ठिकाणी जास्त अपेक्षा ठेवू नका. स्वतःच्या हिंमतीवर काम करा. तुमच्या व्यक्तिमत्त्वात सुधारणा होईल. व्यावसायिक निर्णय घेताना विचारपूर्वक काम करा. त्यामुळे तुम्हाला यश मिळेल.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - राजेंद्र राधाकिसन शर्मा (मोबा. - ९४२२७८४३३६) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

थोडक्यात

## मोहाडी शाळेत १७५ विद्यार्थ्यांना रोपे वाटप



**जळगाव ।** तालुक्यातील मोहाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत शाळेतील १७५ विद्यार्थ्यांना विविध जातीच्या रोपांचे वाटप करण्यात आले. शाळेतील उपशिक्षक गणेश बागुल यांनी विद्यार्थ्यांना वृक्षरोपणाचे महत्व विशद करुन विद्यार्थ्यांना आपल्या आईसोबत एक झाड लावण्यास सांगितले. त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरी जाऊन लावण्यात आलेल्या रोपासोबत विद्यार्थी व त्यांच्या आईचे जीपीएस फोटो काढण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक भीमराव पवार, सुरेखा जोशी, भारती शिंपी, टीना सोनवणे, कविता चव्हाण उपस्थित होते.

## विवेकानंद कॉलेजमध्ये वाणिज्य मंडळाची स्थापना

**जळगाव ।** स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य मंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाचे उद्घाटन सतीश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी पोस्टाच्या विविध सेवा, योजना विविध पदांच्या निवड प्रक्रियेबद्दल माहिती दिली. अध्यक्षस्थानी प्रा. स्वाती बऱ्हाटे ह्या होत्या. प्रास्ताविक वाणिज्य मंडळाच्या अध्यक्षा प्रा. अर्चना जाधव यांनी केले. सतीश पाटील यांनी दीपप्रज्वलन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. आर. बी. ठाकरे, समन्वयक, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पंधरवड्यामध्ये १० लाख झाडे लावणार

**जळगाव ।** जिल्ह्यात दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या सेवा पंधरवड्यात १० लाख वृक्षांची लागवड केली जाणार आहे. त्यासाठी सामाजिक वनीकरण व वन विभागाकडून रोपे उपलब्ध केली जाणार आहेत, अशी माहिती सामाजिक वनीकरणचे सहायक वनसंरक्षक सुदर्शन शिसव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# आयटीआयजवळील कचरा संकलन केंद्राविरोधात मनसेचे आंदोलन

**● दुर्गंधीमुळे त्रस्त ७६५ विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही घेतला सहभाग**

**प्रतिनिधी । जळगाव**

मनपाने महामार्गालगत शासकीय आयटीआयजवळ सुरु केलेल्या कचरा संकलन केंद्रामुळे मोठ्या दुर्गंधी पसरली असून यामुळे आयटीआय, शासकीय तंत्रनिकेतनमधील विद्यार्थ्याचे आरोग्य धोक्यात आले आहे. हे कचरा संकलन केंद्र स्थलांतरीत करण्यात यावे, यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने मनपा प्रशासनाला अनेकदा निवेदन देण्यात आले. मात्र, त्यानंतरही हे कचरा संकलन केंद्र स्थलांतरीत न करण्यात आल्याने बुधवारी (दि.१७) मनसेने आक्रमक भुमिका घेत आंदोलन केले.



या आंदोलनात दुर्गंधीमुळे त्रस्त झालेल्या आयटीयातील ७६५ विद्यार्थ्यांसह ४६ शिक्षकांनीही सहभागी होत, हे कचरा संकलन केंद्र तातडीने स्थलांतर करण्याची मागणी केली. आंदोलनात महानगराध्यक्ष किरण तळेले, विनोद शिंदे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, रज्जाक सय्यद, प्रकाश जोशी, शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील, दीपक राठोड, प्रदीप पाटील, भूषण ठाकूर, राहुल चव्हाण, विशाल जाधव, अनिता कापुरे, लक्ष्मी मोरे सहभागी झाले होते. यावेळी आंदोलकांनी कचरा संकलन केंद्र बंद होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याची भुमिका घेतली.

आरोग्य अधिकारी उदय पाटील यांनी दहा दिवसात यावर तोडगा काढू असे आश्वासन दिल्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

**➤ आश्वासनानंतर आंदोलन मागे...**

एकीकडे स्वच्छ भारतच्या मोठ्या गोष्टी केल्या जातात तर दुसरीकडे गोरगरीबांची मुले ज्या ठिकाणी शिकतात त्या ठिकाणी अस्वच्छता आहे. नागरिकांना तोंडाला रुमाल लावावा लागतो. हे मनपा प्रशासनाला दिसत नसेल तर त्यांचा निषेध करतो. असे सांगून कचरा संकलन केंद्र बंद होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याची भुमिका घेतली. दरम्यान, आरोग्य अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

**➤ मनपाकडून कार्यवाहीला सुरुवात...**

दोन-तीन महिन्यात पर्यायी ट्रान्सपोर्टेशनचे झाले की येथून हे ट्रान्सपोर्टेशन हलविण्यात येईल. सर्विस रोडच्या कामामुळे महामार्ग प्राधिकरणने देखील हे संकलन केंद्र हलविण्यासंदर्भात मनपाला पत्र दिले आहे. त्यामुळे यासंदर्भांत मनपाने देखील कार्यवाहीला सुरुवात केली आहे. विखुरलेला कचरा, घाणीचा येणारा वास यावर तात्पुरती उपाययोजना करण्यात येईल, नेट बसविण्यात येईल, असे आरोग्य अधिकारी उदय पाटील यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले.

# जिल्ह्यातील डॉक्टर्स आज एकदिवशीय संपावर

**प्रतिनिधी । जळगाव**

महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या वादग्रस्त निर्णयाच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमएआय) जळगाव शाखेने गुरुवार दि.१८ सप्टेंबर रोजी राज्यव्यापी एक दिवसीय संपाचे आवाहन केले आहे. या संपामुळे जिल्ह्यातील सर्व खासगी, शासकीय दवाखाने, क्लिनिक्स, ओपीडी आणि रुग्णालये संपूर्णपणे बंद राहणार आहेत. आपत्कालीन (इमर्जन्सी) सेवा केवळ उपलब्ध राहणार आहे.. वैद्यकीय महाविद्यालयासह जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर्सदेखील संपात सहभागी होणार आहेत. आमच्या मागण्या मान्य न झाल्यास एकदिवसीय संप पुढे लांबू शकतो, असे येथील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या जनरल सेक्रेटरी शर्वरी कदम यांनी 'दै.शौर्य मराठी'शी बोलताना सांगितले.

शासनाने ५ सप्टेंबर २०२५ रोजी जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार, सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकोलॉजी (सीसीएमपी) पूर्ण केलेले होमिओपॅथी पदवीधरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये (एमएमसी) नोंदणी करण्याची परवानगी देण्यात आली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या मते, हा निर्णय 'मिक्सोपॅथीला' अधिकृत मान्यता देण्या सारखा आहे. त्यामुळे रुग्णांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

आयएमएने या निर्णयाला विरोध करत सांगितले की, शासनाने यापूर्वी दि. ११ जुलै २०२४ रोजी अशा नोंदणीला स्पष्टपणे मनाई केली होती. त्यामुळे अचानक घेतलेला हा 'यू-टर्न' धक्कादायक आहे. सध्या हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात विचाराधीन आहे. न्यायालयाचा अंतिम निकाल येण्याआधी शासनाचा निर्णय हा कायदेशीर प्रक्रियेचा अपमान असल्याचे आयएमएचे मत आहे. आयएमएने नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल दिलगिरी व्यक्त करत, शासकीय रुग्णालये आणि सार्वजनिक आरोग्य केंद्रांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी भविष्यात रुग्णांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि आधुनिक वैद्यकशास्त्राची अखंडता टिकवण्यासाठी या निर्णयाविरुद्ध संघर्ष करत राहण्याचेही स्पष्ट केले आहे.

# महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात द्या!

**● मागणीसाठी बुध्दिष्ट इंटरनॅशनल नेटवर्क, भारत मुक्ती मोर्चातर्फे करण्यात आले धरणे आंदोलन**

**प्रतिनिधी । जळगाव**

बोधगया येथील महाबोधी महाविहारावर ब्राह्मणांचा अनधिकृत कब्जा आहे. तो कब्जा हटवून ते महाविहार बौध्दांच्या ताब्यात देण्यात यावे, यासह विविध मागण्यांसाठी बुध्दिष्ट इंटरनॅशनल नेटवर्क व भारत मुक्ती मोर्चातर्फे बुधवारी (दि.१७) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

बुध्दिष्ट इंटरनॅशनल नेटवर्कचे पुज्य भंते धम्मदीप व भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष देवानंद निकम यांच्या नेतृत्वाखाली हे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी माळी यांना भंते धम्मदीप, भंते संघसेवक, भंते अमरज्योती, भंते संघरक्षित, जिल्हा अध्यक्ष देवानंद निकम आदींनी निवेदन दिले. आंदोलनात सुमित्र अहिरे, विनोद अडकमोल, सुनील देहडे, करीम सालार, मुकुंद सपकाळे, आर.बी. परदेशी, डॉ. शाकीर शेख यांच्यासह समाज बांधव सहभागी झाले होते.



**■ अशा आहेत मागण्या...**

बुध्दिष्ट इंटरनॅशनल नेटवर्कच्या निवेदनात, बोधगया येथील महाबोधी विहारावर ब्राह्मणांचा अनधिकृत कब्जाआहे. तो कब्जा हटवून ते महाविहार बौध्दांच्या ताब्यात देण्यात यावे, नागपुर येथील दीक्षाभुमी येथे धम्माच्या शिक्षण केंद्राची निर्मिती करण्यात यावी, दीक्षाभुमीजवळील कृषी महाविद्यालयचे स्थलांतर करुन त्या ठिकाणी १००० भंते सामावतील असे प्रशिक्षण केंद्र निवासासह करावे, १००० लोकांचे विशाल ग्रंथालय, वाचनालय व प्रबोधन केंद्राची निर्मिती करण्यात यावी, देश विदेशातील बौद्धांसाठी विश्रामगृहाची व्यवस्था निर्माण करावी, दीक्षाभुमीचे सुशोभीकरण करण्यात यावे आदी तर भारत मुक्ती मोर्चातर्फे सर्व निवडणुकीत ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर निवडणूका घ्याव्या, ओबीसींसह सर्व जातींची जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, मुस्लिमांची मॉब लिंचिंग थांबवावी, एस.सी., एस.टी.व ओबीसी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत आरक्षण लागू करण्यात यावे, जळगाव शहरासह जिल्ह्यातील रस्ते तात्काळ दुरुस्त करण्यात यावे, शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांचे सुशोभीकरण करण्यात यावे, जुनी पेन्शन योजना लागू करावी आदी मागण्या करण्यात आल्या.

# रोटाकिड्स जळगाव स्माईल, लिटिल चॅम्प्स, फ्युचर बिल्डर्स क्लबची स्थापना

**प्रतिनिधी । जळगाव**

रोटरी क्लब जळगावतर्फे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी शकुंतला जे. प्राथमिक विद्यालयात रोटाकिड्स जळगाव स्माईल, ज.सु. खडके प्राथमिक विद्यालयात रोटाकिड्स जळगाव लिटिल चॅम्प्स आणि काशीबाई उखाजी कोल्हे माध्यमिक विद्यालयात रोटाकिड्स जळगाव फ्युचर बिल्डर्स या तीन क्लबची स्थापना करण्यात आली. यावेळी नूतन कार्यकारणीची घोषणा करुन पदग्रहण करण्यात आले.

याप्रसंगी सहाय्यक प्रांतपाल डॉ.अपर्णा भट-कासार, प्रेसिडेंट एन्क्लेव्ह चेअरमन जितेंद्र ढाके, संध्या किशोर, अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर उपस्थित होते. रोटाकिड्स जळगाव स्माईल क्लबच्या अध्यक्षपदी सागर गोपाळ, उपाध्यक्षपदी लतिका भोई, सचिवपदी पायल पाटील यांच्यासह १४ विद्यार्थ्यांची कार्यकारणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. रोटाकिड्स जळगाव लिटिल चॅम्प्स क्लबच्या अध्यक्षपदी अनुपा परिहार, उपाध्यक्षपदी जान्हवी सुरळकर, सचिवपदी नेहा काळे यांच्यासह १२ कार्यकारणी सदस्यांची निवड करण्यात आली. रोटाकिड्स जळगाव फ्युचर बिल्डर्स या क्लबच्या अध्यक्षपदी सुशील अत्तरदे, उपाध्यक्षपदी नव्या महाजन, सचिवपदी कौस्तुभ जगताप याच्यासह १२ कार्यकारणी सदस्यांची निवड करण्यात आली. या सर्व सदस्यांना शपथ देण्यात आली.

कार्यक्रमास रोटरी क्लब जळगावचे स्वाती ढाके, प्रा.डॉ. शुभदा कुलकर्णी, पंकज जयस्वाल, विनया जोशी, योगेश चौधरी, विश्वजीत बऱ्हाटे, शकुंतला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नेहा जंगले, खडके विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सुनील पवार, पुनम पाटील, कोल्हे विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विजय कोल्हे उपस्थित होते.

प्रास्तविक रोटाकिड्स प्रोजेक्ट चेअरमन चैत्राली चौधरी यांनी केले.

## अडथळा ठरणाऱ्या पाच हातगाड्यांवर कारवाई

**जळगाव ।** शहरात वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या ५ खाद्य पदार्थांच्या हातगाड्यांवर सोमवारी मनपाच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाकडून कारवाई करण्यात आली. पथकाकडून सोमवारी सकाळी नेहरू चौक, गोलाणी मार्केट परिसरातील ३, बळीराम पेठेतील खाद्य पदार्थाच्या गाड्या जप्त केल्या आहेत. मुख्य रस्त्यांवर वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या हॉकर्सवरही कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# तंत्रज्ञान आत्मसात करून स्वावलंबन साधावे

**● प्रा.डॉ. राकेश रामटेके यांचे आवाहन**

**प्रतिनिधी । जळगाव**

डिजिटल युगातील नवी आव्हाने स्वीकारणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग समाजहितासाठी करणे ही काळाची गरज आहे. शिक्षण, रोजगार आणि प्रशासन क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका वाढत असून विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान आत्मसात करून स्वावलंबन साधावे, असे आवाहन प्रा.डॉ. राकेश रामटेके यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाच्यावतीने मंगळवारी (दि.१६) 'संगणकीय साक्षरता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावर व्याख्यान व विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलतांना प्रा.डॉ. रामटेके यांनी डिजिटल सामाजिक परिवर्तन : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात आंबेडकरी विद्यार्थी, प्रशिक्षक आणि अधिकारी यांना सुसज्ज करणे या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक डॉ.विजय घोरपडे यांनी केले तर आभार विद्यार्थी गौरव कटारे यांनी मानले.

यावेळी सहाय्यक प्राध्यापिका डॉ.पौर्णिमा वहाणे, इतिहास विभागातील डॉ.सावंत व अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापका उपस्थित होते.

# स्वच्छतेमुळे आपण अनेक आजारांना हरवू शकतो

**● डॉ.उमेश पाटील यांचे प्रतिपादन; स्वच्छता पंधरवडाचा शुभारंभ**

**प्रतिनिधी । जळगाव**

स्वच्छता ही आपल्या जीवनातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. स्वच्छतेमुळे आपण अनेक आजारांना हरवू शकतो, असे प्रतिपादन डॉ.उमेश पाटील यांनी केले.



श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात दि.१६ ते ३० सप्टेंबर दरम्यान स्वच्छता पंधरवडा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ डॉ.उमेश पाटील यांच्याहस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलतांना त्यांनी, विद्यार्थ्यांना हात कसे धुवावे, स्वच्छता कसे राखावी, याबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन उपशिक्षिका करिष्मा घुगे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक मुकेश नाईक यांनी केले. डॉ.उमेश पाटील यांचा रोप देऊन सत्कार करण्यात आला.

## सुनावणीला सहा हरकतदारांची दांडी

**जळगाव ।** प्रारुप प्रभाग रचनेवर घेतलेल्या हरकतींवर समितीने हरकतदारांना बोलावून सुनावणी घेतली. २०पैकी १४ हजर होते. सुनावणीच्या पहिल्याच दिवशी मंगळवारी सहा हरकतदारांनी पाठ फिरवली. महापालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, उपजिल्हाधिकारी अर्चना मोरे, नगररचना विभागाचे नगररचनाकार अमोल पाटील यांच्यासह समितीने सुनावणी घेतली. तेराव्या मजल्यावरील आयुक्तांच्या सभागृहात सकाळी ११ वाजेपासून सुनावणीला सुरुवात झाली.

# विद्यापीठात भारतीय ज्ञान परंपरा दिशादर्शन कार्यशाळेचे आयोजन

**प्रतिनिधी । जळगाव**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्यविद्या प्रशाळा आणि भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी 'भारतीय ज्ञान परंपरा' या विषयावर विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात शिक्षकांसाठी एकदिवसीय भारतीय ज्ञान परंपरा दिशादर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी १०.०० वाजता विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्याहस्ते होणार असून अध्यक्षस्थानी राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे उपस्थित राहतील. तर प्रमुख अतिथी म्हणून दिल्ली येथील वेब भारती संस्थेचे सल्लागार प्रा.प्रशांत पोळ, अमरावती येथील डॉ.मयूरेश शिंगरुप प्र- कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळेत वेब भारती संस्थेचे सल्लागार प्रा.प्रशांत पोळ हे भारतीय ज्ञान परंपरा : संकल्पना आणि प्रासंगिकता या विषयावर बीजभाषण करतील. तसेच भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे मार्गदर्शन करतील. दुपारच्या सत्रात साहित्य,विज्ञान आणि तंत्रज्ञानाची गौरवशाली परंपरा या विषयावर दिल्ली येथील वेब भारती संस्थेचे सल्लागार प्रा.प्रशांत पोळ मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर केशव स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सत्राचे चर्चा प्रवर्तक डॉ.भरतदादा अमळकर यांच्या उपस्थितीत चर्चासत्र होणार आहे. कार्यशाळेतील सहभागींना प्रमाणपत्र देण्यात असून जळगाव, धुळे, नंदूरबार जिल्ह्यातील भारतीय ज्ञान परंपरा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक प्रा.रामचंद्र भावसार यांनी केले आहे.

# खेळात चांगली कामगिरी करुन पदके मिळवा

**● प्राचार्य देबासीस दास यांचे आवाहन; अनुभूती स्कूलमध्ये राष्ट्रीय तायक्कांडो स्पर्धेला सुरुवात**

**प्रतिनिधी । जळगाव**

खेळाडूंनी या स्पर्धेत सहभागी होऊन काहीतरी नवीन शिकावे, खेळात चांगली कामगिरी करून पदके मिळवावे, संधीचे सोने करावे, असे आवाहन अनुभूती रेसिडेन्शियल स्कूलचे प्राचार्य देबासीस दास यांनी केले.

सीआयएससीई सहाव्या राष्ट्रीय तायक्कांडो स्पर्धेचे आयोजन अनुभूती स्कुलमध्ये करण्यात आले असून यास्पर्धेचे औपचारीक उद्घाटन प्राचार्य देबासीस दास यांच्याहस्ते करण्यात आले. त्यानंतर त्यांनी उपस्थित खेळाडूंशी संवाद साधला. यावेळी जैन स्पोर्ट्स् अॅकॅडमीचे प्रमुख अरविंद देशपांडे, महाराष्ट्र तायक्कांडो असोशिएशनचे अजित घारगे उपस्थित होते. तायक्कांडो स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षांखालील ३०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. १८ सप्टेंबरपर्यंत ही स्पर्धा होईल. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी



विविध राज्यांमधून आलेल्या खेळाडूंनी शानदार मार्च पास्ट केले. त्यात बिहार आणि झारखंड, ओडिसा, तामिळनाडू, पाँडिचेरी आणि अंदमान निकोबार, केरळ, कर्नाटक आणि गोवा, आंध्र प्रदेश आणि तेलंगाणा, उत्तर भारत, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, पश्चिम भारत, पश्चिम बंगालचे संघ सहभागी झाले आहेत. मार्च पास्ट झाल्यानंतर मशाल ज्योत निघाली. प्राचार्य देबाशीस दास आणि तायक्कांडोची राष्ट्रीय विजेतेपद मिळवलेली शेजल श्रीमल हिने मशाल प्रज्वलीत केली. विविध खेळांच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग असलेली मशाल ज्योत रन होऊन मुख्य ज्योत ज्योतीने लावली. त्यानंतर तायक्कांडोची शेजल श्रीमल हिने खेळाडूंना शपथ दिली. प्राचार्य देबासीस दास यांनी ही स्पर्धा खुली झाल्याचे जाहीर केले.

पुढे बोलतांना प्राचार्य दास यांनी, सीआयएससीईद्वारा जुलै महिन्यात प्री-सुब्रतो राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धा यशस्वीपणे संपन्न झाल्या होत्या. त्यामुळेच ही राष्ट्रीय पातळीवरची तायक्कांडो स्पर्धा होत आहे. येत्या ऑक्टोबरमध्ये १६ वर्षांखालील मुलांची राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा अनुभूती स्कूलच्या मैदानावर होणार आहे. तसेच पुढील वर्षी जानेवारी महिन्यात भव्य अशी राष्ट्रीय योगासन स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली आहे.

# कॉंक्रिटीकरणासाठी मनपाने दिले पीडब्लुडीला नाहरकत

**प्रतिनिधी । जळगाव**

शहरातील प्रमुख रस्त्यांसह १५ प्रभागातील ९४ रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणासाठी मनपाने सार्वजनिक बांधकाम विभागाला नाहरकत दिली आहे. या संदर्भात मंत्रालयात दाखल प्रस्तावाला मंजुरीसाठी प्रस्ताव दाखल आहे. अंतिम मंजुरी व निधीच्या तरतुदीसाठी पाठपुरावा सुरू आहे. मनपा निवडणुकीपूर्वी मंजुरी मिळावी यासाठी सत्ताधाऱ्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

शहरातील प्रमुख अकरा व कॉलनी भागातील ८३ रस्ते कॉंक्रिटीकरणाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केला होता. त्याला महापालिकेने नुकताच ठराव करून नाहरकत दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने मनपाची निवडणूक जानेवारीपर्यंत घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे मनपा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी अंतिम मंजुरी व निधीची तरतूद करण्याचे आव्हान लोकप्रतिनिधींसमोर आहे. १५ प्रभागांतील ८३ रस्त्यांचा समावेश आहे. हे रस्ते कॉलन्यांतील लहान रस्त्यांना जोडणारे आहेत. आ.सुरेश भोळे यांनी प्रस्तावाला मंजुरीसाठी प्रयत्न सुरू असल्याचे नमूद केले आहे.

# सरकारने लुबाडल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी!

## ● शेतकरी जनआक्रोश मोर्चात माजी मंत्री बच्चू कडू यांची घणाघाती टीका

**प्रतिनिधी । जळगाव**

गेल्या काही दिवसांपासून राज्यभर दौरा करत असताना, कोणत्याच जिल्ह्यातील शेतकरी नफ्यात म्हणजे सुखी असल्याचे चित्र दिसून आले नाही. राज्यातील शेतकरी शिल्लक राहील की नाही, याची आता भीती वाटते आहे. कारण सरकारने तशी व्यवस्थाच करून ठेवली आहे. तसेच सरकारने पीक विम्यासह सर्व बाबतीत शेतकऱ्यांना लुबाडल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत, अशी टीका प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजीमंत्री बच्चू कडू यांनी केली.

जळगाव येथे बुधवारी महायुती सरकारच्याविरोधात शेतकऱ्यांचा जनआक्रोश मोर्चा काढला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे) गटाचे नेते माजी खासदार उन्मेश पाटील, शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, जिल्हाप्रमुख कुलभूषण पाटील, महानगराध्यक्ष शरद तायडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार, महानगराध्यक्ष शामकांत तायडे, मनसे जिल्हाध्यक्ष ॲड.जमील देशपांडे, शेतकरी नेते एस.बी.पाटील, संदीप पाटील, सुनील देवरे, शिवराम पाटील,छावाचे भीमराव मराठे,ॲड.विश्वासराव भोसले,अशोक लाडवंजारी यांच्यासह शेतकरी नेते व्यासपीठावर उपस्थित होते.

माजीमंत्री बच्चू कडू पुढे म्हणाले की, पंतप्रधान मोदींचा आज वाढदिवस आहे.याच दिवशी विदर्भातील १५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. राज्यातून कापड तर विदेशात पाठविला नाही. उलट २५ लाख गाठी आयात करुन शेतकऱ्यांच्या जखमेवर खपली काढली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीआधी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची घोषणा हवेत विरली,अशी टीका करीत माजीमंत्री बच्चू कडू म्हणाले की, सरकारपेक्षा शेतकऱ्यांचा मला जास्त राग येतो. कारण, केळीचा भाव ३०० रूपयांपर्यंत घसरला आहे. कापसाला सहा हजार आणि सोयाबीनला ३४०० रूपयांपेक्षा जास्त भाव नाही. ज्वारी खरेदी वेळेवर




केली जात नाही. बियाणे धड चांगले मिळत नाही. किटकनाशकांमध्ये घोटाळा आणि रासायनिक खतांमध्ये भेसळ असल्याने शेतकरी सर्व बाजुंनी होरपळला आहे. तरीही शेतकरी गुपचुप का आहे. आणि त्यांना सरकारचा राग का येत नाही, असा प्रश्न बच्चू कडू यांनी उपस्थित करुन १०० रूपये कमी-जास्त झाले तर रिक्षावाल्याशी आपण भांडतो. ५० रुपये एखाद्या मजुराने जास्त मागितले तर त्याच्याशी वाद घालतो. एखादी वस्तू खरेदी करताना किती भाव करतो आणि तिकडे सरकारकडून क्विंटलमागे तीन हजार रूपयांनी लुटले जाते. ही लूट आजच नाही तर कित्येक वर्षांपासून होत आहे. तरी शेतकऱ्यांना सरकारचा राग येत नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. तसे पाहिले तर सरकार फार दोषी नाही, शेतकरी जास्त दोषी आहेत. शेतकरी काही बोलत नसल्याने ही सगळी व्यवस्था बदल्याचे चित्र असलल्याची टीका त्यांनी केली. शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) नेते माजी खासदार उन्मेश पाटील आणि बच्चू कडू यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. या प्रसंगी शेतकऱ्यांसमोर बोलताना माजी खासदार पाटील तसेच बच्चू कडू यांनी महायुती सरकारला चांगलेच धारेवर धरले.

### ● संकटमोचक जनतेसाठी नाहीच!

माझ्यावर वैयक्तिक ३५० गुन्हे दाखल आहेत आणि त्यापैकी चार गुन्ह्यात शिक्षा देखील झाली आहे. खुद्द माझ्या आईने मला शेतकरी आणि अपंगांसाठी लढताना हजार गुन्हे दाखल झाले तरी घाबरू नको. आणखी जोमाने लढ, असे सांगितले आहे. मात्र, तुम्ही एक गुन्हा दाखल होण्यासाठी घाबरत आहात. काय फरक पडणार आहे. नाही नेपाळसारखे करू, पण त्यांच्या घरापर्यंत तर जाऊ. तुमच्या जिल्ह्यातील संकटमोचक फक्त पक्षासाठी आहेत, ते जनतेसाठीच नाहीत. हे सगळे गुलाम आहेत. एकेकाळी जोरात आवाज करणाऱ्यांच्या खालूनही आता आवाज निघत नाही, असा टोला त्यांनी मंत्री गिरीश महाजन आणि गुलाबराव पाटील यांना लगावला.

**शासनाने कापूस उत्पादक संपविण्याचा उचलला विडा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये जिल्ह्यातील तीन मंत्री, आठ आमदार सहभागी आहेत. प्रत्यक्षात, त्यानंतरही कृषी कर्जमाफी, केळीसह कापसाचे भाव, ज्वारी खरेदी, पीकविमा नुकसान भरपाई यासारख्या अनेक प्रश्नांनी शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. केळी, कापूस, ज्वारी, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांमध्ये त्यामुळे तीव्र नाराजी पसरली आहे. मोठ्या कष्टाने उत्पादित केलेली केळी मातीमोल भावात विकण्याची वेळ आल्याने संबंधित सर्व शेतकरी हवालदिल झाले. परंतु, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जिल्ह्यातील एकही मंत्री, खासदार किंवा आमदार पुढे आल्याचे दिसले नाही. वास्तविक, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासह राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि ना. संजय सावकारे तसेच जिल्ह्याचे दोन्ही खासदार, ११ आमदार जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करतात. लोकसभा निवडणुकीवेळी देवेंद्र फडणवीस यांनी जळगावमध्ये कापूस भावांतर योजना जाहीर केली होती. मात्र, ती घोषणा नंतर हवेत विरली. त्याबद्दल जिल्ह्यातील कोणत्याच मंत्र्याने नंतर मुख्यमंत्री फडणवीस यांना विचारणा देखील केली नाही. आता तर ११ टक्के आयात शुल्क हटवून शासनाने कापूस उत्पादक संपविण्याचा विडाच उचलला आहे, अशी टीका माजी खा.उन्मेष पाटील यांनी केली.

### ● जिल्हाधिकारी कार्यालयात शिरले शेतकरी

जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी जनआक्रोश मोर्चा पोहोचल्यानंतर सभेत रुपांतर झाले. यावेळी माजी आमदार बच्चू कडू यांच्यासह मान्यवरांची भाषणे झाली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी आंदोलनसस्थळी येऊन विविध मागण्यांचे निवेदन स्वीकारावे, अशी शेतकऱ्यांनी इच्छा व्यक्त केली. मात्र, सायंकाळचे ५ वाजूनही जिल्हाधिकारी कार्यालयातून कोणीच न आल्याने शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचे बंद गेट उघडून आत शिरले व घोषणाबाजी केली. यावेळी माजीमंत्री बच्चू कडू व माजी खासदार उन्मेश पाटील यांच्यासह शेतकरी नेते आर्दीनी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांना निवेदन दिले.




# एकही नागरिक आयुष्मान कार्डाविना राहता कामा नये

## ● आ.अमोल जावळे यांचे प्रशासनाला निर्देश

**प्रतिनिधी । फैजपूर**



माझ्या मतदारसंघातील एकही नागरिक आयुष्मान भारत कार्डाविना राहू नये, जे पाणंद रस्ते नकाशावर दाखल नाहीत त्यांचे मॅपिंग करून क्रमांक देण्यात यावेत आणि घरकुल योजने अंतर्गत लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून द्यावी. या तिन्ही बाबी मिशन मोडमध्ये पूर्ण व्हाव्यात, असे स्पष्ट निर्देश आमदार अमोल जावळे यांनी प्रशासनाला दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस (१७ सप्टेंबर) आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती (२ ऑक्टोबर) या निमित्ताने महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस व महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून राज्यभर सेवा पंधरवडा राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने रावेर तालुक्यातील फैजपूर विभागीय कार्यालयात सोमवारी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले, प्रसंगी ते बोलत होते. पाणंद रस्त्यांचे मॅपिंग आणि लोकसहभाग बैठकीत आमदार अमोल जावळे यांनी सांगितले की, जे पाणंद रस्ते नकाशावर दाखल नाहीत त्यांचे मॅपिंग करून क्रमांक देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

यासाठी शेतशिवार फेऱ्या घेऊन शेतकऱ्यांना सहभागी करणे आवश्यक आहे. घरकुल लाभार्थी आणि आयुष्मान कार्ड मोहिमेला गती घरकुल योजनेत ज्यांना मंजुरी मिळाली आहे, त्यांना घरासाठी योग्य जागा उपलब्ध करून द्यावी, असा आग्रह आमदारांनी व्यक्त केला. तसेच आरोग्याच्या दृष्टीने एकही नागरिक वंचित राहू नये म्हणून येत्या १५ दिवसांत मिशन मोडमध्ये आयुष्मान भारत कार्ड वितरण करण्याचे आवाहन त्यांनी केले. या बैठकीस उपविभागीय अधिकारी बबन काकडे, तहसीलदार मोहनमाला नाझीरकर, बंडू कापसे, बीडीओ विनोद मेढे, मंजुश्री बोरसे उपस्थित होते.

## ट्रेलर कारवर आदळला; महिला ठार, दोघे जखमी

**जळगाव ।** पुणे येथून जळगावकडे परतणाऱ्या कारला भरधाव ट्रेलरने धडक दिल्याने ५८ वर्षीय महिला जागीच ठार झाल्या. तर त्यांचे पती व वाहन चालक हे जखमी झाले. हा अपघात सोमवारी दि. १५ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता अजिंठा घाटाच्या पायथ्याशी झाला. मिताली सुभाष पाटील (वय-५८) असे मयत महिलेचे नाव आहे. त्यांचे पती सुभाष राजाराम पाटील (वय ६०) व चालक योगेश बारी (वय ३५, रा. शिरसोली, ता.जळगाव) हे जखमी झाले आहेत.

# बिलवाडी हत्याकांडातील चौघांना २२ पर्यंत कोठडी

**प्रतिनिधी । जळगाव**

तालुक्यातील बिलवाडी या गावामध्ये दि.१४ रोजी सकाळी २ कुटुंबांमध्ये वाद झाला होता. त्या वादातून हाणामारी होऊन एका ५५ वर्षीय इसमाचा खून करण्यात आला होता. तर ११ जण जखमी झाले. सोमवारी सकाळी मृतदेह ताब्यात न घेता गोपाळ कुटुंबीय व ग्रामस्थांनी सुरुवातीला आकाशवाणी चौकात चक्का जाम केला होता. या घटनेत एकूण १० जणांना अटक करण्यात आली आहे. यातील फरार तिघांना न्या. एस. व्ही. मोरे यांच्या कोर्टात हजर केले असता दि. २२ पर्यंत पोलिस कोठडी मिळाली आहे. या घटनेत एकनाथ निंबा गोपाळ (वय ५५) यांचा जागीच मृत्यू झाला होता. बिलवाडी गावातील गोपाळ आणि पाटील कुटुंबांमध्ये गेल्या १० वर्षांपासून जुना वाद सुरू आहे. या वादातून हे हत्याकांड घडले आहे. यात सुरुवातीला ७ व नंतर ३ संशयित आरोपींना अटक करण्यात आली आहे. घटनेत प्रमुख संशयित रोहिदास पाटील हा सूत्रधार असल्याचा आरोप गोपाळ कुटुंबीयांचा आहे. त्यासाठी त्यांनी सोमवारी आकाशवाणी चौकात चक्का जाम करून जिल्हाधिकारी कार्यालय येथे घोषणाबाजी करून नंतर जिल्हाधिकारी व पुढे एसपी कार्यालयात जाऊन पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले होते. यातील ३ फरार रोहिदास काशिनाथ पाटील (वय-५०), कल्पेश बाळासाहेब पाटील (वय २३), संगीताबाई रोहिदास पाटील (वय ४०) यांना दि. १७ रोजी अटक करण्यात आली आहे. त्यांना कोर्टात हजर केले असता त्यांना २२ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी मिळाली.

# शिरसोलीच्या बारी समाज विद्यालयात विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**प्रतिनिधी । शिरसोली**

बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यालयाचे मूळ संस्थापक स्वर्गीय शंकरराव दशरथराव बारी व स्वर्गीय गं.भा. कस्तुराबाई शंकरराव बारी यांच्या स्मरणार्थ विद्यालयातून विविध विषयात प्रथम, द्वितीय, व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसाचे वाटप करण्यात आले.



शिरसोली येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज माध्यमिक शिक्षण मंडळ शिरसोली या संस्थेचे मूळ संस्थापक स्वर्गीय शंकरराव दशरथराव बारी व स्वर्गीय कस्तुराबाई शंकरराव बारी यांच्या स्मरणार्थ विद्यालयात प्रथम, द्वितीय, व तृतीय आलेले विद्यार्थी तसेच प्रत्येक विषयातून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पार पाडण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अर्जुन काटोले हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव सुरेश अस्वार, संस्थेचे कार्यकारी अधिकारी मनोज बारी, सुरेश बारी,संचालक शशिकांत वाणी, भास्कर खलसे, राजेश आंबटकर, संजय ताडे, अशोक काटोले, विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र आंबटकर, पर्यवेक्षक रामकृष्ण पाटील, प्राथमिक विद्यालयचे मुख्याध्यापक गोपाल बारी हे उपस्थित होते. मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती च्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सदर बक्षीस इयत्ता बालवाडी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना देण्यात आले. विद्यालयाचे माजी प्रभारी मुख्याध्यापक सुरेश शंकरराव बारी यांनी आपल्या आई वडिलांच्या स्मरणार्थ सदरचे बक्षीस दिलेत. प्रसंगी संस्थेचे कार्यकारी अधिकारी मनोज बारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सचिव सुरेश अस्वार यांनी शंकरराव बारी यांचे संस्थेसाठी चे योगदानबद्दल माहिती दिली. सुरेश बारी यांनी आई-वडिलांच्या स्मरणार्थ प्रत्येक वर्षी जास्तीत जास्त मुलांना बक्षीस देण्याचं मनोदय व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून बक्षीस मिळवावेत असा आवाहन देखील त्यांनी केले.मुख्याध्यापक राजेंद्र आंबटकर यांनी आपले मत व्यक्त केले. प्रसंगी पर्यवेक्षक रामकृष्ण पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या अपघात विमाबद्दलचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अर्जुन काटोले यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## गुढे येथे आज समाधान शिबिराचे आयोजन

**भडगाव ।** ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नाचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी तत्पर निकाली काढण्यासाठी गुढे येथे दि.१८ रोजी सकाळी १० वाजता श्री संत तुकाराम महाराज प्रतिष्ठानच्या सभागृहात आ.किशोर पाटील यांचे अध्यक्षतेखाली पाचोरा उपविभागीय अधिकारी भुषण अहिरे यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजीत करण्यात आलेले आहे. उपस्थितीचे आवाहन केले आहे.

# खिर्डी येथे ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात महिलांचा एल्गार



**प्रतिनिधी । रावेर**

तालुक्यातील खिर्डी बुद्रुक येथे रस्त्याची दुरवस्था आणि नागरी सुविधांच्या अभावामुळे संतप्त झालेल्या महिलांनी ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात जोरदार आंदोलन केले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष झाल्याने, परिसरातील महिलांनी जिल्हा परिषद मराठी शाळेजवळील मुख्य रस्ता पत्र्याचे कुंपण लावून बंद केला. जोपर्यंत रस्त्याचे काम मार्गी लागत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, असा ठाम निर्धार महिलांनी व्यक्त केला आहे.

खिर्डी बुद्रुक गावातील मध्यवर्ती भागातील रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पेव्हर ब्लॉक आणि गटारींची व्यवस्था नसल्यामुळे रहिवाशांना, विशेषतः महिलांना, मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येकडे प्रशासनाचे वारंवार लक्ष वेधूनही काहीच कार्यवाही झाली नाही. त्यामुळे अखेर आज सकाळी महिलांनी एकत्र येत ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत रस्ता बंद केला.

**महिलांची संतप्त प्रतिक्रिया**

या आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या वंदनाबाई पाटील आणि सुनंदाबाई भंगाळे यांनी आपली व्यथा मांडली. आम्ही या रस्त्याच्या दुरवस्थेला कंटाळलो आहोत. यावरून चालणेही अवघड झाले आहे. जोपर्यंत रस्ता पूर्ण होत नाही, तोपर्यंत आम्ही हे आंदोलन सुरूच ठेवू. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

या संदर्भात खिर्डी बुद्रुकच्या लोकनियुक्त सरपंच, संगीता भास्कर पाटील यांनी स्पष्टीकरण दिले. त्या म्हणाल्या की, गावातील रस्त्याचे काम खा. रक्षाताई खडसे यांच्या निधीतून काँक्रिटीकरणद्वारे प्रस्तावित होते, परंतु ग्रामस्थांनी पेव्हर ब्लॉकची मागणी केली. त्यासाठी आवश्यक निधी ग्रामपंचायतीकडे नाही. त्यामुळे आमदार निधीतून निधी मिळवण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. निधी मिळताच लवकरच काम सुरू केले जाईल.

महिलांच्या या आंदोलनामुळे प्रशासनावर दबाव वाढला असून, आता या रस्त्याचे काम कधी सुरू होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्तांना सर्वतोपरी मदत करणार

## ● आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांचे शेतकऱ्यांना आश्वासन

**प्रतिनिधी । जळगाव**

जिल्ह्यातील जामनेर, नेरी,चिंचखेडा गावात व परिसरात अतिवृष्टीमुळे घरे व शेत पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनातर्फे सर्वतोपरी मदत करण्यात येईल. असा विश्वास राज्याचे जलसंपदा ,आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिला. जामनेर तालुक्यातील नेरी गावातील भोरटक्के नगर, इंदिरानगर, बाजार पट्टा तर पाचोरा तालुक्यातील शिंदाड, सातगाव या गावातील अतिवृष्टी झालेल्या भागाची पाहणी करताना श्री महाजन बोलत होते.



यावेळी त्यांच्या समवेत आमदार किशोर पाटील, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता प्रशांत सोनवणे, जामनेर तहसीलदार नानासाहेब आगळे आदी उपस्थित होते.

ना. महाजन पुढे म्हणाले की, यावर्षी राज्यात सर्वत्र मोठया प्रमाणावर पाऊस होत असून, जळगाव जिल्ह्यात काही भागात अतिवृष्टी झाली आहे, त्यामुळे या परिसरातील शेती पिकाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले असून,काही भागातील घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे घरांचे सुद्धा नुकसान झाले आहे. पुरामुळे अनेक गावात गुरे दगावली असून पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या भागात प्रशासनातर्फे मदत कार्य सुरू असून,एनडीआरएफ टीमच्या मदतीने बचाव कार्य सुरु आहे. या भागात पाऊस थांबल्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आहे. नुकसान झालेल्या भागात तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या आहेत. पाचोरा तालुक्यातील,शिंदाड, सार्वे बु., सातगाव या गावात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागाची पाहणी करताना मंत्री श्री महाजन यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी, गावकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना धीर दिला. ते म्हणाले,शासन पूर्णपणे आपल्या पाठीशी असून शासनतर्फे नुकसानी संदर्भात लवकरच मदत दिली जाईल असे त्यांनी यावेळी सांगितले. तालुक्यातील पिंपळगाव व बरखेडी या दोन मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. गहुले, वडगाव कडे, सातगाव डोंगरी, वाडी, शेवाळे व वाणेगाव या ६ ते ७ गावांमध्ये नदी-नाल्यांना पूर आला आहे. साधारणतः ३५० ते ४०० कुटुंबांना सुरक्षिततेसाठी शाळांमध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे. शिंदाड, सातगाव डोंगरी, पिंप्री खु. प्रपा, वाडी शेवाळा या गावात तब्बल ४०० जनावरांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याची माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली.